राज्यातील सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य शासन नियंत्रित संस्था यांच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व प्रकारच्या वीज जोडण्यांची देयके महावितरण कंपनीच्या संयुक्त बिलिंग (Composite Biling) प्रणाली व्दारे केंद्रीकृत पध्दतीने अदा करण्याबाबत प्रशासकीय सुधारणेस मान्यता देण्याबाबत. ....शुद्धीपत्रक.

महाराष्ट्र शासन

ऊर्जा विभाग

शासन शुद्धीपत्रक क्रमांक: संकिर्ण-२०२६ /प्र.क्र. १००/ऊर्जा-५

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २४ ऑगस्ट ,२०२६

संदर्भ :- शासन निर्णय उद्योग,ऊर्जा ,कामगार व खनिकर्म विभाग क्र: संकिर्ण-२०२६/प्र.क्र.१००/ऊर्जा-५,दि.१६.०३.२०२६.

शासन शुद्धीपत्रक:-

संदर्भाधिन शासन निर्णयामध्ये याव्दारे खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

१. संदर्भाधिन शासन निर्णयामध्ये ज्या ठिकाणी "शासकीय कार्यालयांची वीज देयके" व त्यासंदर्भाने उल्लेख आहे, त्याठिकाणी "सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य शासन नियंत्रित संस्था यांच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व प्रकारच्या वीज जोडण्यांची देयके" असे वाचण्यात यावे.

२. परिच्छेद क्र. ८.५ नंतर खालीलप्रमाणे परिच्छेद क्र. ८.६ नव्याने प्रविष्ट करण्यात येत आहे:-

"८.६ शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची आणि राज्य शासन नियंत्रित संस्थांच्या वीज जोडणीची देयके त्यांच्या स्तरावर अदा करण्यात येतात. तथापि आता, सदर वीज जोडणी देयके केंद्रीकृत पध्दतीने संयुक्त बिलिंग प्रणालीव्दारे वित्त विभागाकडून ऊर्जा विभागास आगाऊ स्वरूपात एकत्रितपणे अदा करण्यात येतील. सदर वीज देयकांच्या प्रमाणात वित्त विभाग/संबंधित प्रशासकीय विभागाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणारे अनुदान/ वित्तीय सहाय्यातून (All Sources) सदर देयकाची रक्कम वजावट/समायोजित करण्यात यावी. राज्य शासन नियंत्रित संस्थांनी वीज देयकाची रक्कम सदर संस्थेच्या मुख्यालयामार्फत आगाऊ स्वरूपात एकत्रितपणे महावितरणच्या संयुक्त बिलिंग प्रणाली खात्यामध्ये जमा करावी. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी नगर विकास विभाग, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ग्रामविकास विभाग आणि शासन नियंत्रित संस्थांसाठी संबंधित प्रशासकीय विभाग नोडल विभाग म्हणून काम पाहतील."

३. परिच्छेद क्र. ९.१ मध्ये पुढील मजकूर नव्याने प्रविष्ट करण्यात येत आहे :- "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी नगर विकास विभाग, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ग्रामविकास विभागाने आणि राज्य शासन नियंत्रित संस्थांच्या बाबतीत संबंधित प्रशासकीय विभागाने नोडल अधिकारी नियुक्त करावा."

४. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६०८२४१८१२३२३४५३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SURYAKANT KISAN NIKAM
Date: 2026.08.24 18:13:40 +05'30'

(सुर्यकांत निकम)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा/सभापती/उप सभापती विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
३) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई -३२.
४) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मुंबई -३२.
५) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व क्रिडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मुंबई -३२.
६) मा. मंत्री (अपारंपारिक ऊर्जा), मंत्रालय, मुंबई -३२.
७) मा. राज्यमंत्री (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई -३२.
८) सर्व मा.मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
९) सर्व विधानसभा/विधान परिषद सदस्य
१०) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
११) अपर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई-३२.
१२) अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४) सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई-३२.
१५) सचिव,महाराष्ट्र वीज नियामक आयोग,कफ परेड,मुंबई.
१६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी, फोर्ट, मुंबई.
१७) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
१८) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, प्रकाशगंगा, बांद्रा (पूर्व), मुंबई.
१९) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
२०) संचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पूणे.
२१) मुख्य विद्युत निरीक्षक,उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,चेंबूर पूर्व,मुंबई-७१.
२२) कार्यासन अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२३) निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२४) ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.